# परीक्षा शुल्कमाफीसाठी एक कोटी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



**पूरबाधित ५० हजार विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचा निर्णय**



> यावर्षी अतिवृष्टी व महापुरामुळे ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक व शैक्षणिक नुकसान झाले त्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय विद्यापीठातर्फे घेण्यात आला. या निर्णयानुसार पूरबाधित विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयांकडून मागवण्यात आली आहे. माफ होणाऱ्या परीक्षा शुल्काची रक्कम एक कोटीपर्यंत जाण्याची शक्यता गृहीत धरून आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.
>
> – डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील ४४९ पूरग्रस्त गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाच्यावतीने अंतिम टप्प्यात आली आहे. महाविद्यालयांकडून पूरबाधित विद्यार्थ्यांची यादी मागवण्यात आली असून त्यानुसार ५० हजारांवर विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ होणार आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्वनिधीतून एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

ऑगस्टमध्ये आलेला महापुराचा फटका कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील अनेक गावांना बसला. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ३४५ गावे तर सांगली जिल्ह्यातील २३३ गावे पूरबाधित होती. सांगली जिल्ह्यातील १८ गावांना पुराचा वेढा पडला होता. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील ३२ महाविद्यालयांमध्येही पाणी घुसले होते. महापुराच्या फटक्याने पूरग्रस्त गावातील विद्यार्थ्यांचे कौटुंबिक व शैक्षणिक नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील अखत्यारित येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या तसेच विद्यापीठाच्या विविध अधिविभागातील पूरबाधित विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याचे काम सप्टेंबरपासून हाती घेण्यात आले होते. याअंतर्गत कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना पूरबाधित विद्यार्थ्यांचे तपशील देण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले होते.

दरम्यान, ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या विद्यापीठाच्या सत्रपरीक्षांची फी पूरबाधित विद्यार्थ्यांसाठी माफ करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आला. हा विषय मॅनेजमेंट कौन्सिलच्या बैठकीत मांडून त्याला मंजुरी घेण्यात आली. प्राथमिक अहवालानुसार पूरबाधित विद्यार्थ्यांची संख्या ४० हजार असल्याचे निदर्शनास आले. मात्र महाविद्यालयांकडून पूरग्रस्त विद्यार्थ्यांबाबत येत असलेल्या माहितीनुसार पूरबाधित विद्यार्थ्यांचा आकडा ५० हजारांच्या घरात जाणार असल्याचे दिसून येत आहे. ऑक्टोबरमध्ये सुरू होत असलेल्या परीक्षेचा अर्ज भरण्याची तारीख उलटून जाऊ नये, यासाठी ज्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क जमा केले आहे, त्या विद्यार्थ्यांना परतावा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी विद्यापीठाच्या स्वनिधीतील एक कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**पहिल्या टप्प्यात कोटीची तरतूद**

परीक्षा शुल्क माफीसाठी पहिल्या टप्प्यात विद्यापीठातर्फे एक कोटीची तरतूद केली आहे. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जासोबत शुल्क भरले आहे त्यांना परतावा देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. तर परीक्षा अर्ज भरण्यापूर्वी शुल्कमाफीचा निर्णय जाहीर झाल्याने ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शुल्क भरले नाही त्यांच्या फी माफीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही.

# विद्यापीठात दिव्यांगांचा सन्मान

कोल्हापूर, ता. ३ : विविध क्षेत्रांत चांगले काम करणाऱ्या दिव्यांग बांधवांचा सन्मान करून आज शिवाजी विद्यापीठामध्ये जागतिक दिव्यांग दिन झाला. शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज्, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे होते.

समावेशी शिक्षण संसाधन केंद्र संचालिका डॉ. नमिता खोत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. प्रतिभा देसाई संचालक यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् यांनी प्रमुख पाहुण्याची ओळख करून दिली. या



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी अपंग दिन कार्यक्रमात रोपट्याला पाणी घालताना डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, पवन खेबुडकर, अमन मित्तल, डॉ.नमिता खोत, डॉ. गुरव आदी.**

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला जलार्पण करून दिली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मित्तल यांनी दिव्यांग बांधवांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. चेतना अपंगमती विकास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष पवन खेबुडकर यांनी माहिती दिली. यावेळी विद्यापीठ अंतर्गत गुणवंत दिव्यांग विद्यार्थ्यांचा रोख रक्कम बक्षीस, पुस्तक व प्रमाणपत्र देऊन सत्कार झाला. यावेळी डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, कुलसचिव डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. मनोहर वासवानी, डॉ. लगरे आदी उपस्थित होते. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

# विद्यापीठात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसअॅबिलिटीज, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक अपंग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल व चेतना अपंगमती विकास संस्थेचे अध्यक्ष पवन खेबूडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पवन खेबूडकर यांनी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी, अपंगांबाबतचे कायदे कसे बदलत गेले, याची माहिती दिली. यावेळी विद्यापीठ अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व इतर क्षेत्रामध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचादेखील मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम बक्षीस, पुस्तक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, आर. व्ही. गुरव, मनोहर वासवानी आदी उपस्थित होते. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

# समाजशास्त्र विभागाचे सुवर्णमहोत्सवात पदार्पण

## विविध कार्यक्रमांचे उद्‌घाटन; माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

**कोल्हापूर, ता. ३ :** शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग १९७० ला सुरू झाला. यंदा विभागाने ५० व्या वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे उद्‌घाटन समारंभाचे आयोजन केले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांचा सत्कारही झाला.

माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार होते. समाजशास्त्र विभागात प्रकाशित झालेले ऑकेझनल पेपर, सुवर्णमहोत्सवी वर्षाचे प्रतीक म्हणून कॉफीमग देऊन मान्यवर, पहिल्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. पवार यांनी



समाजशास्त्र विभागाचा विकास कसा झाला, विभागाचा विकास होण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले, प्राध्यापकांच्या उत्कृष्ट कामकाजामुळे समाजशास्त्र विभाग व्यवस्थित चालवू शकलो. प्रा. डॉ. व्ही. जे. मारुळकर आणि प्रा. बोडे यांनी विभागातील शैक्षणिक प्रवासाबद्दल माहिती सांगितली. तसेच विभागातील माजी विद्यार्थी वेगवेगळ्या पदावर रुजू आहेत, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रा. डॉ. एस. एन पवार पारितोषिक प्रा, डॉ. आर. बी. पाटील पारितोषिक दिली जातात याबद्दलचे विवेचन डॉ. आर. बी. पाटील मनोगतातून व्यक्त केले.

प्रा. डॉ. जे. बी. आंबेकर, प्रा. डॉ. श्रीकांत यांनी मनोगते व्यक्त केली. प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. उज्ज्वला पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास साधणे शक्य

## डॉ. डी. कार्तिकेयन : विद्यापीठात अधिकारी प्रशिक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास साधणे शक्य असल्याचे प्रतिपादन भारत सरकारच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. कार्तिकेयन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांच्या आठवडा प्रशिक्षण कार्यक्रमास मंगळवारी प्रारंभ झाला. उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. कार्तिकेयन यांनी विविध नियमित कार्यक्रम, शिबिर याविषयी माहिती दिली. सर्व अधिकाऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे कसा संवाद साधावयाचा याबाबत माहिती दिली.



**कोल्हापूर : प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना डॉ. डी. कार्तीकेयन.**

डॉ. निवास देसाई यांनी यावेळी हवामानातील बदल व बदलत्या हवामानाचा मानवावर होणारे परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. माळी पी. आर. यांनी आभार मानले.

लोकमत

# कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ रवाना

## कर्णधारपदी स्नेहा शिंदे; अमरावती येथे उद्यापासून प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उद्या, गुरुवार (दि. ५) ते सोमवार (दि. ९) दरम्यान पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ शिवाजी विद्यापीठाचा महिला कबड्डी संघ रवाना झाला. विद्यापीठाच्या संघामध्ये स्नेहा शिंदे (कर्णधार), मृणाली टोणपे, प्रतीक्षा पिसे, प्राजक्ता पाटील, वसुंधरा माने (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर), सुप्रिया ढोकळे, ऐश्वर्या देशमुख (केआरपी कन्या महाविद्यालय इस्लामपूर), प्रीती कारवॉ (व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी), प्रतीक्षा धामणेकर (व्ही. के. चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर), गौरी निकम (कृष्णा महाविद्यालय, रेठरे), पूजा पाटोळे (केबीपी कॉलेज, इस्लामपूर), तेजस्विता नार्वेकर (आजरा महाविद्यालय) यांचा समावेश आहे. या संघासोबत प्रशिक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक प्रा. डॉ. रमेश भेंडिगिरी, संघ व्यवस्थापक प्रा. संजय पाटील रवाना झाले आहेत.

या संघातील खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्रा. गणेश लवंगारे, अतुल टोणे, विक्रमसिंह नांगरे यांनी शुभेच्छा दिल्या.

# कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ रवाना

**कोल्हापूर :** अमरावती येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. या संघात राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या - स्नेहा शिंदे (कॅप्टन), मृणाली टोणपे, प्रतीक्षा पिसे, प्राजक्ता पाटील, वसुंधरा माने. के.आर. पी.कन्या महाविद्यालय इस्लामपूरची -सुप्रिया ढोकळे, ऐश्वर्या देशमुख, व्यंकटेश महाविद्यालयइचलकरंजीची - प्रिती कारवा, व्हि.के. चव्हाण महाविद्यालय इस्लामपूरची प्रतीक्षा धामणेकर, कृष्णा महाविद्यालयरेठरेची गौरी निकम, के.बी.पी. कॉलेज इस्लामपूरची पूजा पाटोळे, आजरा महाविद्यालय आजराची तेजस्विता नार्वेकर यांचा समावेश आहे. या संघासोबत प्रशिक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक प्रा. डॉ. रमेश भेंडिगिरी, संघ व्यवस्थापक प्रा. संजय पाटील हे आहेत. कबड्डी खेळाडूंना शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्रा. गणेश लवंगारे, प्रा. अतुल टोणे, प्रा. विक्रमसिंह नांगरे यांचे प्रोत्साहन लाभले.